म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. ना.
दा. क्र. ८८०२



संगीत

# सहीची किंमत

1RBK-0108802

* नवसाक्षर प्रौढासाठी *

संगीत

# सहीची किंमत

• लेखक

वि. ना. कोठीवाले

• किंमत

४० नवे पैसे

• तृतीय श्रेणी

८८०२

अनुक्रम ३०९८८
विभाग
क्रमांक २३५८
नों. दि.

वाचनालय

८८०२
पो. वा.

IRBK-0108802

विद्या प्रकाशन
४५० बुधवार पेठ, पुणें २.

## प्रथमावृत्ति निवेदनावरून

खास नवसाक्षर प्रौढासाठी वाङ्मय निर्माण करणे हा लोकशिक्षणाच्या कार्यक्रमातील महत्त्वाचा भाग आहे. असे वाङ्मय लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन होऊ शकेल. हे वाङ्मय लोकप्रिय व्हावे म्हणून ते निर्माण करण्यापूर्वी प्रौढ नवसाक्षरांच्या गरजा, त्यांचे अनुभव, त्यांचे आवडते विषय, त्यांची शब्दसंपत्ति या सर्व गोष्टींचा लेखकानी नीट परिचय करून घेतला पाहिजे. त्याचबरोबर लोकशिक्षणाचा बदललेला आशय व ते देण्यामागील तात्विक भूमिका, याबाबतीत इतर देशात व आपल्या देशात चाललेले प्रयत्न यांची पण लेखकाना माहिती असणे आवश्यक आहे. ही नवी दृष्टी घेऊन बाहेर पडणारे साहित्यिक अनुभवाच्या आधारावर आपली अधिकाधिक प्रगति करून नवसाक्षरासाठी विपुल प्रमाणांत वाङ्मय निर्माण करतील व त्याच्यामार्फत लोकशिक्षणाचे व पर्यायाने लोकशाही सुस्थिर करण्याचे काम सुकर करतील असा विश्वास आहे.

**सि. शा. भांडारकर,**
शिक्षणाधिकारी, मुंबई राज्य.

---

## दुसऱ्या आवृत्तीबद्दल

नवसाक्षरासाठी चांगल्या पुस्तकांची उणीव होती. ती नाहीशी करण्यासाठी भारत सरकारने राज्यसरकारतर्फे भोर येथे शिबीर भरविले होते. त्या शिबिरात तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सदर पुस्तक लिहिले गेले. या पुस्तकाची पहिली आवृत्ति महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीतर्फे प्रकाशित झाली होती. लोकप्रियतेमुळे ती आवृत्ति संपली. आमच्या प्रकाशनातर्फे लोकशिक्षणाच्या पाच ग्रामीण नाटिका व सात वाचन-पत्रिका यापूर्वीच प्रसिद्ध झाल्या आहेत. या पुस्तकाच्या प्रकाशनाने लोकशिक्षण सेवेस मोलाचे सहाय्य होणार आहे. हे सहाय्य केल्याबद्दल प्रकाशन संस्था लेखकांची ऋणी आहे. या पुस्तकाचे पुनर्मुद्रण महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीच्या सौजन्याने होत आहे.

—प्रकाशक.


अनुक्रम 30788
विभाग बालवाङ्मय
क्रमांक 2348
नों. दि. ...

संगीत

# सहीची किंमत

( ग्रामीण-जीवनातील एक वास्तवपूर्ण एकांकिका. )

( स्थळः—चावडी. भाग्या वेसकर खालील लावणी गुणगुणत चावडी झाडायच्या तयारीत प्रवेश करतो. एका कोपऱ्यात कोणीतरी घोंगडी पांघरून गुरफुटून झोपला आहे. उशाला त्याचा मामुली बाडबिस्तरा. )



: लावणी :

भाग्या वेसकर :—

तुम्ही या या या या या, अशा हो समयाला ।
येऊनि जरा जावा जी । तुमी जरा येऊनि आधी
जावा जी ॥ धृ ॥ मोरासाठी मोरांगा झुरते जी ।
पाटलावाचून चावडी सुनी दिसते जी । चावडीविना
खेड्याची वस्ती जी । वस्तीविना 'पांढरी' ना दिसती
जी । ही दिसती ना संमदी दुनिया । ही झुकती ना
सारी दुनिया । पठ्ठे बापूराव बालेघाटी । लावणी केली
पवळीसाठी । गातो मंग चंद्रा पौळीसाठी ॥ १ ॥

(झाडणार तोच झोपलेला माणूस पाहून) आँ! चावडीवर तण्णावून कुनी दिलीया? रातचं त्रायकोशी भांडावं आन् हथं सरकारी चावडीवर येऊनश्यान् लवंडावं. (घोरण्याचा आवाज) अरेच्या, ह्यु तर अक्शी बिनघोर डारडूर व्हऊनश्यान् घोरतुया! हातभट्टीवाला तर नव्हं! कुनी का असंना; पन जागा कराया व्होवा! आँ, कोन झोपलंया जी! उठा की राव! त्यो बगा, दोन कासरं सूर्य्य वर आलाया. उठा, राव लवकर! मला चावडी झाडायचीया. (मोठ्यांदा ओरडून) अरं ए झोपणाऱ्या गड्या —

(एक फकीर जांभया देत उठतो.)

फकीर : या अल्ला! सबको सलामत रक्खे! बेटा, मुझे बहोत निंद आ रही! मै और जरा सोता हूं.

(पुन्हा पहिल्यासारखंच घोंगडं गुरफटून निजतो.)

भाग्या : घ्या, काय करायचं हथं? या मियानं तर चावडीची मशीद केली! ह्यू अल्लाहजरत पाकिस्तानचा हेर हाय का वांद्र्याचा गायकसाई गुरं खेरदीला हथं खेड्यात आलाया! त्या श्रीपत गवळ्याची म्हस रातोरात मेली म्हून ही—

(पडद्यात : "म्हैस मेली नाही, तर ती मारली!")

आँ कोन? सरपंच भुजंगराव दांगट, पोलीस पाटील साहेबराव कवसकुले, आन् बरोबर श्रीपतराव गवळी. आता आली का पंचाईत? आज-ऊंद्या म्हनं, एक सरकारचा बडा अधिकारी चौकशीला येणार हाय! तलाठ्यानं चावडी

सारवूनश्यान् अक्क्षी साफसूफ–स्वोच्छ ठेवाया सांगितलंया पण हथं बगावं तर,–(पाहून) आलीच ही मंडळी हाकडं. तवा अदूगर गम्मतच बगाया होवी.

( भाग्या वेसकर आंत जातो. नंतर ग्रामपंचायतीचा सरपंच भुजंगराव दांगट व पोलीस पाटील साहेबराव कवसकुले, हे रागारागानं प्रवेश करतात. बरोबर श्रीपत गवळी. )

साहेबराव : श्रीपती, मी तुला नक्की सांगतो. तुझी म्हैस मेली नाही, तर ती मारली.

भुजंगराव : (रागानं) आन् तीबी त्या आपल्या पांडुमास्तरानं.

श्रीपती : तो बिचारा गरीब ब्राह्मण मास्तर. आपल्या मुलाना विद्यादान करतोय. शिवाय, तुमचा-आमचाच तो बालमित्र. अहो, त्याच्या बापाकडूनच तुम्ही–आम्ही शिकून फायनल झालो ना ?

साहेबराव : अरे पण, तो तुमचा-आमचा बाप होऊन बसलाय ना या गावात

भुजंगराव : ( मिशीवर ताव देत ) बुवाबाजी चालविलीया बेट्यानं ! जथं पहावं तथं हैच. तुमची-आमची पोरं–पोरी घेऊनश्यान् रस्तं काय झाडतुया, झाडं काय लावतुया, पाणोठं काय बांधतुया––

श्रीपती : ( मध्येच ) मग काय करणार बिचारा ! ग्रामपंचायतीचे लोक आणि तुम्ही सरपंच––

भुजंगराव : (मध्येच चिडून रागानं) काय, गावात हजामती करतुया व्हय ?

श्रीपती : हो ! एक वेळ त्या केल्या तरी चालतील; पण तुम्ही ग्रामपंचायतीचे सरपंच होऊन, न्हाव्याप्रमाणं कुडाला तुंबड्या लावित हिंडती, हे चांगलं नाही. अशानं साक्षर झालेलं आपलं गांव, तुम्ही खोट्या सह्या घेऊन एकांद्या दिवशी पेटवाल ! जाळून भस्म कराल.

साहेबराव : (कागद पुढं करीत) मग काय, तूं या कागदावर सही करीत नाहीस ?

श्रीपती : नाही ! मरू दे माझी म्हैस मेली तरी ! पण पांडुमास्तरावर, मी माझा हा असा खोटा वहीम ठेवून त्याच्यावर मुळीच पोलीस-कारवाई करणार नाही.

धोंडुअण्णा : (भटजी प्रवेश करीत) करणार नाही म्हणजे ! ती करायला हवी ! अरेरे, राम राम राम ! शांतम् पापम् ! शांतम् पापम् ! ! हा ब्राह्मण मास्तर, त्या बोंबील ओढ्यात, सारे महार-मांग एकत्र जमवून, मेलेली म्हैस कापून राहिलाय. छीः छीः ! थूः थूः !

साहेबराव : धोंडुअण्णा, अहो नुसत्या कल्पनेनं सुद्धा मला मराठ्याला ओकारी येते !

धोंडुअण्णा : पण ब्राह्मणयोनीतल्या त्या कर्मचांडाळ पांड्याला काहीं आहे का ? अहो, आज म्हशी मारून हा चिरफाड करतो; उद्या तो आपली शाळेतली मुलं कापायचा !

भुजंगराव : अक्श्शी बरोबर बगा धोंडभटजी तुम्ही हे हेरलंत! हडकी-हडोळा म्हनं हडकी हाडोळा! याच्या बानं तरी कंदी असलं वंगाळ काम केलं व्हतं का? त्ये काय नाय, साहेबराव! तुम्ही ही म्हस मारल्याची फिर्याद त्येच्या नावानं पोलीसात लावाच बगा! आणा तो तुमचा पंचनाम्याचा कागद. पहिली गिरविलेली सही मी ठोकतो.

(साहेबराव कागद पुढं करतो. तो सही करतो.)

श्रीपती : (निर्धारानं) पण मी अशी माझी खोटी सही करणार नाही. पांडूमास्तर हा देवमाणूस आहे. ब्राह्मणाला गायी दान देण्याचा काळ नाही. नाहीपेक्षां, या श्रीपती गवळ्यानं हजारो गायी त्याला दान दिल्या असत्या! तिथं एका मेलेल्या म्हशीकरता,-अरे हट! तुमच्या या बनावट कारस्थानाला बळी पडू? शहाणे आहात!
(तुच्छता दाखवून श्रीपती निघून जातो.)

साहेबराव : (त्याच्याकडे पाहात) अस्सं काय? हा गवळ्याचा हल्यादेखील, त्या पांड्यालाच पान्हवला होय!

भुजंगराव : पान्हवू दे! पन याची बाईल ती सगुणा, ती हाय ना माझ्या हातात. तिची सही—

साहेबराव : (आतुरतेने) तुम्ही आणता या कागदावर? सगुणा सही देईल?

भुजंगराव : अक्श्शी, राजीखुशीनं! डोळे मिटूनश्यान्! अवो, चार दोन शेर लोण्याच्या गोळ्याची मागणी केली की,

गवळणीच्या मताचं पारडं झुकलंच बगा आपल्या बाजूला. आँ साहेबराव! गोकुळच्या किस्नाचा खेळ हाय ह्यो!

साहेबराव : (आनंदून) अहाहा! तुम्ही जर सगुणेची सही मिळविली तर आत्ताच मी पांडूमास्तराला अटक करून या चावडीवर बांधून ठेवतो.

धोंडुअण्णा : ठेवा बांधून! लेकानं गावात फारच उच्छाद मांडलाय. लबाड! भजन-कीर्तन काय करतो! गुलाम, महारा-मांगाना एकत्र आणून झुणका-भाकरीचे सत्यनारायण काय करतो! दापोलीच्या फाटकगुरुजीप्रमाणं मेलेल्या जनावरांची कातडी काय कमावतो! आता फक्त भंग्याची टोपली घेऊन, ती तुमच्या-आमच्या थोबाडावर त्यानं मारायची शिल्लक ठेवलीय! साहेबराव, तुम्ही पोलीस पाटील आहात, कांही करा; पण हे पाप पाठवा बुवा कसंही करून एकदाचं तुरुंगात!

साहेबराव : (कागद पुढं करीत) पंच म्हणून या कागदावर सही करता का?

धोंडुअण्णा : अहो एक का, विष्णुसहस्रनामाइतक्या मी सह्या करतो! आणा कागद.

(साहेबराव कागद देतो. धोंडुअण्णा खोटी सही करतो.)

भुजंगराव : अजून किती सह्या करायला होव्यात?

साहेबराव : फक्त दोन. त्या मिळविल्या की, फौजदार येईतो कायद्यानं पांडुमास्तरला इथं चावडीवर अटक करून ठेवतो.

भाग्या वेसकर : ( पुढं होतो ) तर मंग पाटील, माझीबी एक सही घ्या की या कागदावर! अवो कसा झालो तरी मी या गावचा गावकामगार हाय!

भुजंगराव : व्हय! व्हय! भाग्या वेसकराची सही म्हंजी आपल्या सरकारचीच खरी दस्तखत असते बगा.


( साहेबरावाकडून कागद घेतो व त्यावर त्याची सही घेतो. )

भाग्या : ( सही करीत उपरोधानं ) पांडुमास्तरा! जा बाबा आता तुरुंगात! माज्या बाईलीलाबी तू लई नादी लावलयास. सारा गाव बोंबलत नाय, पन ह्यो गरामपंचायतचा सरपंच माझ्या नावाची होळी पेटवतुया ना!

( सही करून कागद भुजंगरावाजवळ देतो. )

भुजंगराव : अरं पण शिमग्याच्या सोंगा, मी काई उगाच बोलतुया व्हय? जा, आत्ताच बोंबील वढ्यात! आन् बघ तुझी जया, हाय की नाय त्या पांड्यामास्तराबरूबर! जा, जा, पळ आन् घे खात्री करून! चल माझ्याबरोबर. मी जातो बघ सगुणा गौळणीकडं तिची सही घ्यायला आन् तू जा तुझ्या बाईलीचा परताप पहायला!

( भुजंगराव कागद घेऊन आत जातो, तो गेल्यावर पांडुमास्तर जया महारीण व चार दोन तरुण महार त्याच्याबरोबर खालील तुकारामाचा अभंग म्हणत हडकी–हडोळा करून परत येता येता चावडीवरून जातात. )



अनुक्रम 30988
विभाग
क्रमांक 2458

### अभंग

**पांडुमास्तर :**

॥ आम्ही जातीचे ब्राह्मण । आमचे सोयरे मुसलमान ॥
॥ लेक चांभारा घरी दिली । सून महाराची ती केली ॥ धृ ॥
॥ आमचा आचार मोठा भारी । आम्ही उभे मांगाद्वारी ॥ १ ॥
॥ काल वरात मिरविली । सोयरीक महारा घरी केली ॥ २ ॥
॥ वेदामागे सवळे गेले । गाय मारून शुद्ध केले ॥ ३ ॥
॥ तुका म्हणे झालो व्याही । देतो विठ्ठलाची ग्वाही ॥ ४ ॥

साहेबराव : ( रागाने भजन बंद करीत ) पांडू, बंद कर तुझे हे भजन. कोण तू आपल्याला समजतोस ?

पांडुमास्तर : ( शांत राहून ) कोणी नाही ! मी एक क्षुद्र पामर आहे !

साहेबराव : सकाळीच कुठं गेला होतास, सांग पाहू ?

पांडुमास्तर : कुठं नाही ! सकाळीच मी माझी स्नान-संध्या आटोपली आणि हा ' हडकी-हडोळा ' करून आलो.

धोंडुअण्णा : त्यापेक्षा, या जया महारणीबरोबर बोंडील ओढ्याचा फेरफटका मारून आलो, असं का बेधडक सांगत नाहीस ?

पांडुमास्तर : हो ! तसंहि समजा ! कारण, मी या हरिजन बंधूंना हडकी-हडोळ्याचं - त्यांचं बुडीत उत्पन्न, स्वतः त्यांच्याबरोबर काम करून ते पुन्हा मिळवून देतोय.

जया : ( पुढं होत ) जी व्हय पाटील ! अवो, आज वरीस झालं मेलेली गुरंढोरं तशीच वाया जात व्हती.

१ ला महार : गिधाडं, घारी खाऊनश्यान् त्येचं एक कातडंबी धड मिळत नव्हतं. पण या मास्तर गुरुजींनी आमाला आमच्या हडका-हडोळ्याचं गिन्यान दिलं बगा. मेलेल्या गुराढोरांच्या हाडा-कातड्याचा बेपार, म्हंजी आमच्या खेड्यातला हडका-हडोळा !

२ रा महार : नाय तर आमी इक्त्या दिस, आपलं थाळं नेऊनश्यान चार दोन शेर मेलेल्या गुराचं मांस आन् त्ये बी कोल्ह्या-

कुत्र्यानं खाल्लेलं आणीत व्हतो. आन् खात व्हतो. पन या मांसापासनंच आपल्या शेताला लागणारं कंपोज (कंपोष्ट) खत तयार करत्यात, हे कोना लेकाला ठाव व्हतं ?

२ रा महार : आन् हाडंबी बारीक करूनश्यान् त्येचंबी खत शेतीला कामी येतं, हेबी कोना गाढवाला ठाव व्हतं ?

जया : मेलेल्या जनावरांची हाडं आन कातडी, ही आमी संमदी इकूनश्यान् शे-दोनशे रुपये कमावतो बगा, पाटील.

पांडुमास्तर : छे ! छे ! एवढ्यावर कसले संतुष्ट राहता ? बाबानो, अरे हजारो–लाखो रुपयांचा हा आपला हडका–हडोळा आहे बरं ! मुंबईचा नळबाजार, हा इमले बांधून श्रीमंत कोणी केला ? या हडका–हडोळ्यानं ! तुम्ही तुमचा धंदा घाण म्हणून नव्हे, तर आळसानं सोडला ! म्हणून परके श्रीमंत झाले ! अठरापगड जातींचे लोक खेड्यात येतात, राहातात आणि इथला आपला केरकचरा नेऊन, तो मुंबईच्या बाजारात विकतात. ते मग श्रीमंत होतात आणि मुंबईला शोभा आणतात !

धोंडुअण्णा : हो हो तर ! जसा तू ब्राह्मण योनीस दूषण देत देत आज या महार-मांगांना भूषण होऊन बसला आहेस, तसा ! (संतापून) पांड्या, पांड्या; चोरट्या महार का लेका झाला नाहीस ? अरे, कसल्या या घाण धंद्यात तू पडला आहेस मूर्खा !

साहेबराव : आणि धंद्याचा मोह तरी किती विलक्षण अं ! जनावरं मरत नाहीत, म्हणून लोकांची दूध-दुभत्याची जनावरं मुद्दाम मारायची !

धोंडुअण्णा : ( कानावर हात ठेवीत. ) शिवहरे ! शिवहरे ! महत्पाप !! लोकांच्या दुभत्या जनावराना विष घालून मारायचं आणि मग हा हडका-हडोळा घाण धंदा म्हणून लोकाना सांगायचं ! वा रे मास्तर ! वा ! छान !! आहेस हो !

पांडुमास्तर : ( साश्चर्य ) काय बोलता हे धोंडुअण्णा ! कोण कुणाची दुभती जनावरं मारतोय इथं ?

साहेबराव : तू-तू दुधाळ जनावरं मारतोयस !

पांडुमास्तर : याला पुरावा ?

भुजंगराव : ( खोटा पंचनाम्याचा केलेला कागद घेऊन प्रवेश करीत ) ह्यो बग ! तू मारलेल्या म्हशीच्या मालकीणीचा, त्या सगुणा गौळणीच्या अक्श्शी सही-शिक्क्याचा पुरावा ! आन् तुला तुरुंगात नेयाचा परवाना ! है की नाय ?

भाग्या : बगूं. बगूं. सगुणेची सही ! ( पाहून मिस्किलपणानं ) अरच्या, खरंच की ! आन् असल्या या वंगाळ कामाला माजी जयाबी सामील ! छ्या ! छ्या ! बाईल हाय का गरामपंचायतीचं ह्ये ( भुजंगरावाकडं मिस्किलपणानं पहात ) स्वाँग है ! जया, ये म्होरं ! चंडाळणी, या बामण मास्तराच्या नादी लागूनश्यान तू समदी आपली बेचाळशी नरकात लोटलीयास बग !

जया : काय केलं वो कारभारी ?

भाग्या : ( उसन्या रागात ) अग कारभारी-केरभरी राहिला घरी ! इथं या चावडीम्होरं मी न्यायनिवाडा करनारा या खिणाचा

अधिकारी हाय वग ! बोल, तू या मास्तराच्या नादी लागूनश्यान गवळ्याची म्हस का म्हून मारलीस? आज तू दुधाळ म्हस कापलीस, ऊंद्या या पांडुरंगापायी तू मला कापशील !



जया : धनी – धनी मी म्हस मारली नाय जी ! अक्षी मरीआईची आण !

भाग्या : मरीआई, जरीआई राह्यल्यात देवळात ! हथं ही सही, सगुणेची काय सांगत्येया ? (काठीनं खोटं मारण्याचा आव आणित अग भवाने ! थांब. तुजं टक्कुरंच या काठीनं शेंदाडावानी बिल-बिलं करूनश्यान् टाकतो !

साहेबराव : थांब भाग्या ! सरकारचा कायदा, तू आपल्या हातात घेऊ नकोस ! ( मध्ये पडतो. )

भाग्या : [ जयेकडे डोळे मिचकावीत पण उसन्या रागानं पहात ] बस्स करा राव ! असल्या द्वाड – वंगाळ बायका, जित्याच जाळाया होव्यात ! त्याबिगर आमास्नी दुसऱ्या बायका सरकार आता करू देनार हाय व्हय ? थांब सजणे ! त्या धोंड्या न्हाव्याचा, म्हशी भादरायचा वस्तरा आणूनश्यान्

मी आता तुजं, या भर चावडीवर नाकच कापतो बग! बेहत्तर हाय मी तुरुंगात गेलो तरी!

( रागाचा आविर्भाव आणून तो निघून जातो. )

भुजंगराव : पोलीस पाटील, सगुणा गौळणीनं या पांडुमास्तरावर म्हैस मारून कापल्याची ही फिर्याद गुदरली हाय! तवा येला अटक करा. ( बनावट सहीचा कागद देतो. )

साहेबराव : बेशक! तसा अटक करण्याचा मला तात्पुरता अधिकार आहे! ( जयेला ) जये, तू शहाणी असशील तर इथून निघून जा.

जया : कशी जाऊ? तुमी समदं या देवमाणसावर खोटं बोलंट– ( चिडून ) कुभांड रचताया! ( रडू लागते. )

धोंडूअण्णा : देवमाणूस कसला हा! गावची गुरं चोरून कापणारा हा खाटीक, कसाई, मांग आहे! आणि हा असला भयंकर माणूस शाळामास्तर म्हणून काम करतोय!

भुजंगराव : बराबर! आज जनावरं कापली, ऊंद्या पोरं कापील!

साहेबराव : पांडू, चल चावडीवर बैस. हा रिपोर्ट पोलीसठाण्याला मी आता रवाना करणार आहे.

पांडुमास्तर : खुशाल करा! तुम्ही पोलीस पाटील आहात! तेव्हां खोटं–नाटं करण्याचा तुम्हाला संपूर्ण अधिकार आहे. ( जाऊ लागतो. त्याला अडवून. )

साहेबराव : चाललास कुठं?

पांडुमास्तर : माझ्या शाळेची वेळ झालीय! तेव्हां मला जायला हे हवंच! (जाऊ लागतो.)

भुजंगराव : अरं, आता तुजी शाळा है एरवड्यात! (भेसूर हसतो.)

पांडुमास्तर : देवदयेनं तसं होणार असेल तरी त्यात मला आनंद आहे; पण मला शाळेची वेळ चुकविता येत नाही.

(पुन्हा जाऊ लागतो.)

साहेबराव : (रागानं) पोलीस पाटलाचा हुकूम मोडून तू कायद्याचा अपमान करतोयस?

पांडुमास्तर : मी गुन्हेगारच जिथं नाही, तिथं कायदा कसला आणि गुणंची अपमान कुणाचा?

भुजंगराव : (खिशातील हंटर काढून साहेबरावास देत) लकडी-शिवाय मकडी वळणार नाय! पोलीस पाटील, पाहता काय? करा येला चांगला जेरबंद! नायतर मला सांगा, करतो लंबा हथं.

पांडुमास्तर : (तुच्छतेनं) ऊः! मोगलाई थोडीच आता राहिलीय?

साहेबराव : (हंटर उगारून) अस्सं का? गाजवू का परत मोगलाई पांड्या?

(हंटरनं त्याला मारणार तोच चावडीवरील फकीर उठून)

फकीर : हाँ खामोष! मांडुमास्तरांच्या अंगाला कुणी हात लावला तर खबरदार!

साहेबराव : ( उर्मटपणानं ) तू कोण आहेस ? आणि चावडीवर का झोपला होतास ? ही काय तुझ्या पाकिस्तानातली चावडी, तू समजलास की काय ?

भुजंगराव : पाटील, मला वाटतं ह्यो गडी पाकिस्तान सरकारचा हेर असावा ! अवो राव ! पाहता काय ? करा यालाबी अटक आन् द्या पाठवूनश्यान् येरवड्याची हवा खायला.

मोहनराव : ( दाढी काढून वेषाविष्करण करीत. ) थांबा ! आधी मला तुमची गठडी बांधू द्या. मग मी येरवड्याची हवा खाईन, समजलास ? ( शिटी देतो. )



पांडुमास्तर : ( साश्चर्य ) कोण ? शिक्षणाधिकारी मोहनराव माने ? ( नमस्कार करतो. सर्व जण चकित होतात. इतक्यात डोक्यावर ट्रंक व होल्डाल घेतलेला भाग्या वेसकर हा इन्स्पेक्टर पोलीससह प्रवेश करतो. )

भाग्या : आँ! जोहार मायबाप सरकार! संगं ह्येबी करडं सरकार आणलंया!

मोहनराव : (हसत, इन्स्पेक्टर रघुनाथराव राणे यास) या. अगदी वेळेवर आलात, राणेसाहेब!

भाग्या : तर–तर! माझ्या पांडुमास्तराच्या हाकेला जसाकाई रामच धावून आलाय!

मोहनराव : अरे, फौजदारसाहेबांचं नावच रघुनाथराव राणे आहे. हे पहा–(दोघंहि कानाशी लागतात.)

इन्स्पेक्टर : थांबा मोहनराव! मी हे देवकार्य अगोदर पुरे करतो. नंतर मग आपण बोलू या! (शिपायास) शिपाई, काढ बेड्या आन् ठोक त्या तिघाना! बदमाष! खोट्यानाट्या सह्या घेऊन आणि करून, वर गावचे अधिकारी म्हणवितात! जा आता तुरुंगात बसा सारे!

(शिपाई साहेबराव, भुजंगराव व धोंडुअण्णा याना बेड्या घालून कैद करतात. गावकरी स्त्री–पुरुष व मुले आपोआपच चावडीवर जमतात. श्रीपती गवळी हाहि जमावात आलेला असतो.)

धोंडुअण्णा : (मोठ्याने गळा काढीत) अहो फौजदारसाहेब! मी मेलो हो!

इन्स्पेक्टर : (दरडावून) ए ब्रह्मराक्षसा! ओरडू नकोस. मी तुला मारहाण थोडीच केलीय? काय पोलीस पाटीलसाहेब, इंग्रजाना जाऊन आज दहा वर्षे झाली, तरी पण तुमची ही अजून कारस्थानं करायची घातुक सवय कांही गेली नाही!

भाग्या : आँ ! कशी जाईलजी ? जित्याची खोड मेल्याबिगर जशी जात नाय, तशी ती त्येच्या मरणाला बी कारण व्हते बगा सरकार !

इन्स्पेक्टर : ( सरपंचाकडं वळून ) काय सरपंच ! बोलून–चालून तुमचं नावच भुजंगराव मग काय सगळ्या गावाचं वारूळ करून, तुमचा नागोबा पुन्हा फडा काढायला ग्रामपंचायतीत आहेच टपून बसलेला ! आज कुणाला दंश करणार होतात ?

मोहनराव : ( हसत ) पांडुमास्तराना. बिचारा हाडाची काडं करीत गाव सुधारतोय ना ! ते या ग्रामकंटकाना कसं पाहवणार ? लोकाकडून फसव्या सह्या घ्यायच्या आणि सरकारकडं कागाळ्या करायच्या ! दुसरा धंदा काय ?

इन्स्पेक्टर : ( बनावट तक्रारी अर्ज वाचून ) अर्जदार सगुणा मर्द श्रीपती गौळण कोण ?

श्रीपती : ( साश्चर्य पुढं होत ) आँ ! अहो साहेब ! ही तर माझी बायको आहे ! पण आज ती सही करायला इथं येणार कशी ? पंधरा दिवापूर्वीच ती बाळंतीण व्हायला आपल्या माहेरी गेलीय ! साहेब, माझ्या बायकोची ही सही बनावट आहे ! खोटी आहे. आत्ता कोणी तरी ती केली आहे.

१ ला मुलगा : ( धीटपणानं पुढं येत. ) खरंय साहेब, या आपल्या सरपंच भुजंगरावानं मला आता हे दोन पैसे देऊन– ( पैसे दाखवितो. ) हे नाव लिहून घेतलंय !

इन्स्पेक्टर : आणि तू ते लिहिलंस ?

१ ला मुलगा : होय साहेब. वर्गात मास्तर म्हणतात, अक्षर चांगलं गिरवीत राहावं, म्हणजे ते सुधारतं ! ( सर्वत्र हशा )

इन्स्पेक्टर : पण बाळ, अशा दुसऱ्याच्या खोट्या सह्या करणं, हा भयंकर गुन्हा आहे !

१ ला मुलगा : तुरुंगात जाण्याइतका ?

इन्स्पेक्टर : हो ! अशा गुन्ह्याला वर्ष सहा महिन्यांची सहज शिक्षा होते.

२ रा मुलगा : ( पुढं येतो. ) आन् इरड करताना गाय–म्हस मारली, तर त्येला शिक्षा व्हते ?

इन्स्पेक्टर : ( साश्चर्य ) म्हणजे ? तू असं जनावरं मारण्याचं काम केलं आहेस का ?

२ रा मुलगा : व्हय साहेब, खोटं कशाला बोलू ! केलं पाप कबूल करतो. सरकार, या आपल्या पोलीस पाटलानं मला एक विखाची पूड दिली.

इन्स्पेक्टर : बरं पुढं ? तिचं मग तू काय केलंस ?

२ रा मुलगा : ती विखाची पूड मी या श्रीपत गवळ्याच्या म्हशीला काल इरड करताना चारली.

इन्स्पेक्टर : कुठं ? कोणत्या जागेवर ?

२ रा मुलगा : या आपल्या धोंडुअण्णा बामणाच्या मागल्या परसात.

इन्स्पेक्टर : बरं, तिथं म्हैस कुणी आणली ? का अगोदरच ती तिथं चरत होती ?

२ रा मुलगा : नाय, धोंडुअण्णानंच म्हशीला हाकलून आपल्या परसात आणलं व्हतं !

धोंडुअण्णा : कंबख्ति ! भरली माझी शंभर वर्षे.

भुजंगराव : भरली माजी मौत ! त्ये वीख मीच आणलं व्हतं.

साहेबराव : झाला सारा घोटाळा ! आता माझं सारं कारस्थान उघड होणार !

इन्स्पेक्टर : काय भूदेव ! श्रीपत गवळ्याच्या म्हशीवर तुमची ही वाकडी नजर का वळली हो ?

धोंडुअण्णा : साहेब, क्षमा करा. आता जानव्याची शपथ घेऊन मी सारं कांही खरं खरं सांगतो.

इन्स्पेक्टर : सांगा—सांगा. आम्ही ते सारं ऐकायलाच इथं आलो आहोत.

धोंडुअण्णा : फौजदारसाहेब, मागं या पोलीस पाटलानी या पांडु-मास्तरासंबंधी गावकऱ्यांच्या सह्या घेऊन एक तक्रारी अर्ज सरकारात केला होता.

मोहनराव : ( अर्ज काढून पुढं धरीत. ) हाच का तो अर्ज ?

धोंडुअण्णा : होय साहेब. पण या अर्जावर श्रीपतीनं सही केली नाही. तेव्हां त्याचा सूड म्हणून आम्ही तिघानी याची म्हैस मारायचं ठरविलं !

इन्स्पेक्टर : अस्सं ! म्हणजे श्रीपतीचं घोडं मारायच्याऐवजी, तुम्ही ही अशी त्याची म्हैस मारली तर !

मोहनराव : पण यामुळे बिचाऱ्या पांडुमास्तराना कोण त्रास होणार होता. ( गावकऱ्याकडे वळून ) काय रे बाबानो, तुमचा हा मास्तर कसा काय माणूस आहे ?

१ ला माणूस : अक्षी देवावानी !

२ रा माणूस : आख्खा गाव साक्ष देईल की, पांडुमास्तर म्हंजी गावचं रतन हाय रतन !

मोहनराव : ( चिडून ) अरे पण मग, या तक्रारी अर्जावर तुम्ही लोकानी सह्या का केल्यात ?

३ रा माणूस : आमास्नी या पोलीस पाटलानी सांगितलं व्हतं की, गावात एक देऊळ बांधायचंया.

४ था माणूस : तवा सरकारकडून मदत मागायचीया ! सह्या करा.

मोहनराव : आणि तुम्ही हा अर्ज न वाचताच सह्या केल्यात ?

१ ला माणूस : जी व्हय. पोलीस पाटील असं कांही अदावतीनं करतील, असं अमास्नी काय बरं ठाव ?

मोहनराव : एकूण पांडुमास्तर तुम्हाला आवडतात तर ?

सर्वजण : जी व्हय. देवमाणूस हाय देवमाणूस !

इन्स्पेक्टर : आलं सारं लक्षात ! एकूण, पांडुमास्तरांचा उत्कर्ष होत असलेला, या वतनदार पोलीस पाटील कंपूला पाहवला गेला नाही, हेच खरं.

मोहनराव : गावकरी बंधूनो ! तुम्ही सर्व सह्या करण्याइतके साक्षर झाला आहात, याबद्दल आनंद वाटतो. परंतु आपण सह्या कशावर करतो आहोत, याचा हा आजपासून नवीन धडा घ्या. कारण, बेसावधपणानं केलेल्या सह्या याही गुन्हेगार ठरविण्यास पुरेशा होतात.

इन्स्पेक्टर : तेव्हां अगोदर नीट लक्षपूर्वक वाचा आणि मग सह्या करा ! आपल्या सहीला फार मोठी किंमत असते, हे विसरू नका ! खोट्या, बनावट सह्या केल्यामुळे, लोक कसे तुरुंगात जातात, ते हे लोक– ( पोलीस पाटील, भुजंगरावादिकडं बोट दाखवीत ) तुरुंगात गेल्यावर तुम्हाला कळेलच.

पांडुमास्तर : ( हात जोडून ) इन्स्पेक्टरसाहेब, या मंडळींना ताकीद देऊन, एकदा माफी देण्याची सवलत—

इन्स्पेक्टर : ( मध्येच ) मुळीच देता येणार नाही. कारण, या लोकानी मुख्य मंत्र्याकडेहि अर्जावर अर्ज पाठवून, उगीचंच सरकारचं चौकशी दप्तर वाढविलेलं आहे. इतक्या दिवस पारतंत्र्यात इंग्रजांना आपली राज्यनिशाणी म्हणून, तुम्हा निरक्षर लोकांचे निशाणी अंगठे वेडे-वाकडे चालले ! यापुढं आपल्या लोकशाही राज्यात, हे असले खोटे, बनावट अर्ज खपणार नाहीत ! याद राखा.

तशा सह्या करून जर सरकारी कारभार संशयाचा केला, तर एकेकाला तुरुंगातच जावं लागेल, समजलं ! ( शिपायास ) शिपाई, याना तालुक्याच्या ठिकाणी घेऊन चला. ने या सर्वांना इथून.

धोंडुअण्णा : असंगाशी संग, प्राणाशी गांठ ! देवा, तुझ्या घरचा न्याय बरोबर आहे.

भाग्या : (जाणाऱ्या मंडळीस) आँ आँ! जोहार पोलीस पाटील, आन् गरामपंचायतचं सरपंच. घाबरू नका. सरकारनं तुरुंगात लई झकास व्यवस्था ठेवलीया अक्षी सासुरवाडीवानी !

भुजंगराव ( उसासा टाकीत ) सरपंच चालला तुरुंगात ! आता गरामपंचायतीचं कसं व्हनार ?

इन्स्पेक्टर : ( फटका मारून ) त्याची तुला नको काळजी ! लोकशाही सरकारला ती आहे.

साहेबराव : बेवकूब सोबती, प्राणाशी गाठ. सरपंच भोवला मला. ( शिपाई तिघाना घेऊन आत जातात. )

इन्स्पेक्टर : मोहनराव, मला प्रश्न हा पडला आहे कीं, सरकारने जे ग्रामपंचायतीचे अधिकार वाढविले आहेत, ते इथून पुढे कसे काय चालणार ? कारण, जोपर्यंत असले वतनी भुजंग तिच्यात वारूळाप्रमाणं घर करून राहिले आहेत, तोपर्यंत गावचं वातावरण विषारीच राहणार.

मोहनराव : केव्हांहि ! आता हेच पाहा ना कीं, या पांडुमास्तरा-संबंधी काय झालं ते ! बरं झालं, मी वेषांतरानं तुमच्या

आधी दोन दिवस आलो. या कामी आपल्या या भाग्या नेसकराचं मला चांगलंच साह्य मिळालं.

इन्स्पेक्टर : होय ! म्हणजे शिक्षणाधिकाऱ्यालाहि सी. आय. डी. प्रमाणं वागायची वेळ आली म्हणता ?

मोहनराव : मग काय करायचं ! अर्जावर सह्या हजारो पडल्या ! म्हटलं पाहू या मास्तरांचा हा पांडवप्रताप ! काय पांडुरंगा, बरं भेटविलंस बा या गावाला !
(कोपरापासून हात जोडतो. गावकरी स्त्री-पुरुष हसतात.)
मित्रहो, हसू नका. हशावारी नेण्यासारखी ही आपल्या "सहीची किंमत" नाही ! ती फार मोठी पृथ्वीमोलाची आहे, हे नीट लक्षात ठेवा. सह्या—सह्यानं जशी जगात शांतता नांदते, तशी ती बिघडतेहि ! सही ही मोठी ठिणगी आहे. ती विचारपूर्वक केली, तर बरं ! नाहीपेक्षा, आपली सही आपल्यावरच काळ्या नागिणीप्रमाणं उलटेल, हे लक्षात ठेवा. आणि मगच सह्या करा.

इन्स्पेक्टर : पांडोबा, तुम्ही याना साक्षर केलंत. आता सह्या कशा कराव्यात, हे या गावकरी मंडळीना नीट समजावून सांगा.

पांडुमास्तर : जशी आपली इच्छा ! बंधूंनो, ऐकलंत ना ? नसल्यास पुन्हा ऐका ! वाटल्यास पाठ करा; पण सही करताना वाचा आणि विचार करा. कारण,—

( चाल–कटाव )

देशबंधूनो ! माय–बहिणीनो ।
" सहीची किंमत " तुम्ही ऐका–हो०–॥

लांब्या–लचाड्या, करून उलट्या, ।
अर्ज वावड्या–उडवू नका. हो जी ॥१॥

खोट्या,–नाट्या बनावटीच्या ।
सह्या करून कुणी फसू नका ॥
उलट्या खोपड्या, आपुल्या झोपड्या ॥
तुरुंग कोणी बनवू नका. हो जी ॥२॥

खोटे कागद, खोटे ऐवज, ।
खरे–खोटे कुणी करू नका ॥
खोटयाला मग सोटा मारुनि, ।
खऱ्यात त्याला मिसळू नका. हो जी ॥३॥

सह्या न करता, वाचू न पाहता, ।
अर्ज, विनंत्या करू नका ॥
निनावी अर्जासहीत दर्जा, ।
चलता पूर्जा पाहू एका. हो जी ॥४॥

अधिकाऱ्यानो, तुम्हीहि ऐका, ।
सही–शिक्क्याला भाळू नका ॥
खऱ्या गोष्टीला, दृष्ट लाविण्या ।
कष्ट मार्ग तो लादू नका. हो जी ॥५॥

सही व्यक्तीची, सही राष्ट्राची. ।
" सहीची किंमत " सोडू नका ॥
पृथ्वी मोलाची, सही भाग्याची ।
सही अक्षरे, दवडू नका. हो जी ॥ ६ ॥

शाळेतील सर्व मुले : ( आनंदून )

गुरुजा, पांडुमास्तरकी जय !

( सर्वजण जयजयकार करतात. )

वन्देमातरम्

— पडदा —

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ८८०२ नों दि .......
वि. ....... बा. वा. क्र. .......

# या नाटिकेतील भूमिका व हितसंबंध

| | | |
|---|---|---|
| १ | मोहनराव माने– | शिक्षणाधिकारी ( वेषांतरित फकीर ). |
| २ | रघुनाथराव राणे– | पोलीस इन्स्पेक्टर. |
| ३ | पांडुमास्तर– | शाळेतील मास्तर पण खरा समाजसेवक. |
| ४ | साहेबराव कवसकुले– | पोलीस पाटील. ( ग्रामकंटक ) |
| ५ | भुजंगराव दांगट– | ग्रामपंचायतीचा सरपंच ( ग्रामकंटक ) |
| ६ | धोंडूअण्णा– | एक भिक्षुक ( ग्रामकंटक ). |
| ७ | श्रीपती गवळी– | खोटी सही न करणारा प्रामाणिक माणूस. |
| ८ | भाग्या वेसकर, गांवचा महार जागल्या. ( महार १, २, ३, ). | |
| ९ | मुले २ | ( एक हिंदु व दुसरा हरिजन ). |

## — स्त्री–भूमिका —

| | | |
|---|---|---|
| १ | जया महारीण. | भाग्या वेसकराची बायको. |

याशिवाय, गांवकरी स्त्री–पुरुष व चार दोन पोलीस वगैरे.

संग्रहालय
अनुक्रम ३०९६८
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

IRBK-0108802
IRBK-0108802